http://amrutmanthan.wordpress.com/

# मराठी शाळांना मान्यता नाकारण्याचा शासनाचा निर्णय अन्यायकारक आहे का?

## (आयबीएन लोकमत – 'आजचा सवाल' दि० ६ सप्टेंबर २०१०)

मराठी शाळांच्या प्रश्नाबद्दल आच असणाऱ्या प्रत्येक स्वाभिमानी मराठी माणसाने पहायलाच पाहिजे असा हा ६ सप्टेंबरचा आयबीएन लोकमत वाहिनीवरील 'आजचा सवाल' कार्यक्रम झाला. या कार्यक्रमामुळे अनेक दिवसांनी एका महत्त्वाच्या विषयावर एक उत्तम, अभ्यासपूर्ण, मुद्देसूद व निर्भीड चर्चा पाहिल्याचा अनुभव मिळाला. असा अत्युत्तम कार्यक्रम सादर केल्याबद्दल त्या कार्यक्रमाचे सूत्रधार श्री० निखिल वागळे यांचे मनःपूर्वक अभिनंदन. शिवाय त्यात सहभाग घेऊन सडेतोड व वास्तवावर आधारित अशा मुद्द्यांद्वारे शासनाचे विविध कांगावे उघडे करणारे नाशिकच्या आनंदनिकेतन शाळेचे संस्थापक-संचालक श्री० अरूण ठाकूर, महाराष्ट्र सामाजिक नवनिर्माण प्रबोधिनीचे प्रमुख व मनसेच्या पुणे विभागाचे सरचिटणीस श्री० अनिल शिदोरे व शिवसेनेचे विधान परिषदेतील आमदार डॉ० दीपक सावंत या सर्वांचेही मनापासून आभार. त्याशिवाय सर्व बाजूंनी इतका मार पडत असताना व बोलण्यासाठी एकही तर्कशुद्ध मुद्दा नसतानाही, पळ न काढता व अप्रस्तुत का होईना पण काहीतरी विधाने करीत शेवटपर्यंत खुर्चीला चिकटून बसल्याबद्दल महाराष्ट्राचे अर्धवेळ (पाववेळ?) शिक्षणमंत्री श्री० बाळासाहेब थोरात यांचेही यांचे देखील कौतुक आपण करायलाच पाहिजे.

प्रस्तुत कार्यक्रमाचा वेळ मर्यादित असल्यामुळे त्यात निवडक पण महत्त्वाच्या मुद्द्यांवरच चर्चा झाली. महाराष्ट्र शासनाचे वस्त्रहरण करणारे इतरही अनेक मुद्दे जनतेसमोर यायला हवेत. केंद्र सरकारच्या शिक्षणाच्या अधिकाराच्या कायद्याप्रमाणे राज्य शासनाने शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांची समिती नेमून त्यांच्या शिफारशी विधिमंडळापुढे ठेऊन त्यांच्या निर्णयानुसारच शिक्षणविषयक कायदे करायला पाहिजेत. पण आमच्या राज्यशासनाला स्वतःला राजकीय सोयीचे निर्णय घेण्याच्या मार्गात कुठल्याही खऱ्या व प्रामाणिक तज्ज्ञांची लुडबुड नको असते. किंबहुना आमचे राज्यशासन हे स्वतःलाच सर्वज्ञ व सर्व विषयांतील सर्वोच्च तज्ज्ञ समजते आणि मग ते स्वतःला व स्वतःच्या पाठीराख्यांच्या स्वार्थाला पोषक असेच सर्व निर्णय घेत असतात. तसे करताना गरीब, अतिसामान्य, प्रामाणिक अशा जनतेची पर्वाच करीत नाहीत.

शिक्षणासारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयाबद्दल आमच्या शासनाला कधीच फारसे महत्त्व वाटलेले नाही. याचे कारण म्हणजे शिक्षण, भाषा, संस्कृती ही राजकारण्यांनी फारसे कमावण्याची खाती नव्हेत, तर केवळ शासनाने गमावण्याची आहेत. त्यामुळे कोणाही राजकारण्याला सुखासुखी शिक्षण खाते नको असते. केवळ एकच शिक्षण खाते घेण्यास तर कोणीच तयार नसतो. त्यामुळे कॉंग्रेस शासनकर्त्यांनी शिक्षण खात्यावर नेहमीच अंशवेळ व राजकीय दृष्ट्या कनिष्ठ असे मंत्री नेमलेले आहेत. सर्वश्री पुरके, विखे, थोरात ह्या अशा (अंशवेळ) मंत्री झालेल्या मंडळींचे शैक्षणिक क्षेत्रातील कर्तृत्व, अनुभव, वाकबगारी पाहण्यापेक्षा बहुधा न्यायालयाकडून (आणि आता जनतेकडून) वारंवार थपडा खाऊनही खुर्ची घट्ट धरून राहण्याच्या राजकीय चिवटपणाचे कर्तृत्व पाहूनच त्यांची निवड केलेली असावी. शिवाय त्यातील प्रत्येकाकडे दुसरे कुठले तरी अधिक 'अर्थपूर्ण' खाते सोपवलेले असल्यामुळे त्यांचे लक्ष साहजिकच मुख्यतः त्याच खात्याकडे असते. न्यायालयाने २००१ या वर्षी तंबी देऊनही आज नऊ वर्षांनंतरही शिक्षणाबद्दलचा तो तथाकथित बृहद्-आराखडा शासनाने बनवलेला नाही व उलट या आपल्या या निष्क्रियतेचीच ढाल करून शासन "तो

आराखडा तयार झाल्यावर मगच आम्ही राज्यभाषा मराठीच्या माध्यमाच्या शाळांना अनुमती देण्याबद्दल विचार करू" असे निर्लज्जपणाने सांगते आणि तसे करत असताना इंग्रजी, हिंदी, कन्नड, गुजराथी, उर्दू माध्यमाच्या हजारो शाळांना मात्र मुक्तहस्ताने अनुमती वाटते, ह्याला काय म्हणावे? ज्या मराठी शाळांमधील मुले सातवी पर्यंत शिकली आहेत पण शाळेला आठवीपासूनची परवानगी दिलेली नाही अशा शाळांतील सातवी उत्तीर्ण झालेल्या मुलांना "शासन निर्णय घेईपर्यंत अमर्याद काळापर्यंत शिक्षण थांबवून शासनाने पुढे अनुमती दिली तरच आठवीपासूनचे शिक्षण चालू ठेवा" असे आपण सांगायचे काय?

सध्याचे शिक्षणमंत्री श्री॰ बाळासाहेब थोरात हे मुख्यतः कृषिमंत्री असून जमेल तसा थोडाफार वेळ शिक्षण खात्यासाठी देतात. आपल्या शासनाला पूर्णवेळ शिक्षणमंत्री नेमण्याच्या ऐवजी कृषि, दुग्धव्यवसाय व पशुसंगोपन हे विभाग पाहणारा मंत्री शिक्षण विभागावर फावल्या वेळात लक्ष ठेवण्यास पुरेसा वाटतो, यापेक्षा अधिक दुर्दैवाची गोष्ट कुठली? (शेवटी शिक्षक व विद्यार्थी, विशेषतः मराठी शाळांतील, यांना राज्यशासन पाळीव पशुंच्यापेक्षा अधिक महत्त्व देत नाहीत ही देखील वस्तुस्थिती आहेच म्हणा.)

गेल्या पाच वर्षात शासनाने एकाही, अनुदानितच नव्हे तर विनाअनुदानित तत्त्वावरसुद्धा, नवीन मराठी शाळा किंवा पुढील वर्ग काढण्याची अनुमती न देता अशा सर्व संस्थांना अनधिकृत असे घोषित करून राज्यभाषा मराठीमधून शिक्षणदान देण्यास बंदी घातलेली आहे. शिक्षण हा मूलभूत अधिकार आहे असे केंद्र सरकारने घोषित केले असतानाच आमच्या राज्यशासनाने मात्र मातृभाषेतून शिक्षण देणे हा मात्र गंभीर गुन्हा ठरवून तो भयंकर अपराध करण्याचा प्रयत्न करणाऱ्या मराठी शाळाचालकांवर फौजदारी कारवाई करण्याची व एकरकमी एक लाख रूपये दंड व त्याशिवाय प्रत्येक दिवसामागे दहा हजार रूपये दंड करण्याची धमकी देणारा शासनादेश काढला आहे. स्वतःच्या पक्षातील मानकर व पद्मसिंह पाटलांसारख्या गंभीर गुन्हेगार मंडळींवर काहीही कृती करण्याचे टाळणाऱ्या दोन्ही सत्ताधारी पक्षांच्या मंत्रीमंडळाने मराठीतून शिक्षण देण्याचा प्रयत्न करणाऱ्या शाळांवर मात्र गुन्हेगारी कारवाई करण्याचे हत्यार उपसले आहे.

कॉंग्रेस ज्यांचे (सोयीप्रमाणे) नाव घेते त्या महात्मा गांधींनी नेहमीच शालेय व उच्च शिक्षणही मातृभाषेतून देण्यावरच भर दिला होता. मात्र त्यांचा वारसा सांगणारे आजचे आमचे राजकारणी तसे करण्याऐवजी राज्यातून मातृभाषेतील शिक्षणाला हद्दपारच करायला निघाले आहेत. यावरून आमच्या राज्यशासनाचा ढोंगीपण स्पष्ट होतो.

अर्थात दुर्दैवाने आतापर्यंत विरोधी पक्षांनीही या मुद्द्यावर शासनाचा पुरेसा पाठपुरावा केलेला नाही हे देखील सत्यच आहे. मराठी चित्रपटांच्या बाजूने राजकारण करणाऱ्या मराठीधार्जिण्या राजकीय पक्षांनादेखील या अत्यंत मूलभूत मुद्द्याचे महत्त्व अजूनपर्यंत नीटसे समजलेले दिसत नाही. मराठी शाळाच टिकल्या नाहीत तर पुढच्या पिढीत कोण मराठीत लेखन करणार, कोण वाचन करणार व ती कशी काय अधिकृत भाषा किंवा ज्ञानभाषा होणार? आणि मग मराठीधार्जिण्या पक्षांना मते देण्यास तरी कितीसे लोक तयार होणार? म्हणून निदान निखळ व्यवहार म्हणून तरी मराठीधार्जिण्या पक्षांनी मराठीच्या मुद्द्यावर जिवाचे रान करायला हवे.

आज विनाअनुदान तत्त्वावर अनुमती दिली आणि उद्या त्या शाळेने जर अनुदान मागितले तर शासनाला शिक्षणावर अधिक खर्च करावा लागेल म्हणून अनुदानित किंवा विनाअनुदानित अशा कुठल्याही प्रकारच्या तत्त्वावर राज्यभाषा मराठीचे माध्यम असणाऱ्या शाळांना परवानगी देण्यास नकार देऊन त्यांनी शाळा चालवल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याची धमकी देण्याची शासनाची कृती ही श्री॰ अरूण ठाकूर यांनी प्रस्तुत चर्चेत म्हटल्याप्रमाणे आपल्याला होणाऱ्या मुलीच्या लग्नाला पुढे कदाचित हुंडा द्यायला लागेल की काय या भीतीने मुलीची जन्माआधीच भ्रूणहत्या करणाऱ्या नराधम बापाप्रमाणेच आहे यात संशय नाही.

राज्यभाषा मराठीच्या शिक्षणासाठी हात आखडता घेणारे आमचे राज्यशासन फारसा गवगवा न करता हळूच दुसऱ्या हाताने सर्वपक्षीय नेत्यांचे दारू गाळण्याचे कारखाने, आयपीएल, व अशा इतर अनेक प्राधान्यक्रमाने क्षुल्लक असणाऱ्या गोष्टींवर अनुदान व सवलतींची खैरात करीत आहे हे सत्य लोकांसमोर आणायलाच पाहिजे. स्वतः शिक्षणमंत्री असलेल्या श्री० बाळासाहेब थोरात व इतर राजकारण्यांच्या मराठीच नव्हे तर इंग्रजी शाळांनाही राज्यशासन अनुदान देत आहे हे वास्तवदेखील जनतेने जाणून घ्यायला पाहिजे.

ह्या विषयावर चर्चा करण्यासाठी आयोजित केलेला ६ सप्टेंबर २०१० दिवशीचा 'आजचा सवाल' हा कार्यक्रम महाराष्ट्र शासनाच्या मराठी प्रेमाच्या ढोंगाचा बुरखा फाडणारा होता. राज्यभाषा मराठीच्या माध्यमातील शाळांना मान्य केलेले अनुदानही अनेक वर्षे न देणाऱ्या व नवीन मराठी शाळांवर बंदी घालणाऱ्या महाराष्ट्र शासनाचे धिंडवडे काढणारा होता. आणि त्याचबरोबर प्रत्येक मराठीप्रेमी माणसाला जागे करणारा व आपल्या स्वार्थी, बेपर्वा, असंवेदनशील आणि निर्दय राज्यशासनाच्या विरुद्ध दंड थोपटून उभे राहण्यास उद्युक्त करणारा असाच होता.

प्रस्तुत कार्यक्रम खालील दुव्यावर ८ भागात सादर केलेला आहे. प्रत्येक भाग उघडून संपूर्ण कार्यक्रम पहायला मिळण्यास थोडा वेळ लागतो. पण तेवढा धीर धरावा. एखादा नवीन भाग उघडल्यावर तो आपल्या संगणकात उतरवून (download करून) घेतला जाईपर्यंत संगणक निःशब्द (mute) करून ठेवावा व तो सर्व भाग संगणकाने उतरवून घेतल्यावर त्या कार्यक्रमाच्या प्रदर्शनास (त्रिकोणी बटण दाबून) सुरुवात करावी. म्हणजे एका दमात, अडथळ्याशिवाय तो भाग पाहता येईल. मध्यंतरांतील जाहिरातींचा व्यत्यय नसल्यामुळे पूर्ण कार्यक्रम पाहण्यास दूरचित्रवाणीवर प्रत्यक्ष कार्यक्रम पाहण्यापेक्षा कितीतरी कमी वेळ लागतो.

६ सप्टेंबर २०१० या दिवशीचा आयबीएन-लोकमत वाहिनीवरील 'आजचा सवाल: मराठी शाळांना मान्यता नाकारण्याचा शासनाचा निर्णय अन्यायकारक आहे का?' हा कार्यक्रम खालील दुव्यावर अवश्य पहा.

http://ibnlokmat.tv/showvideo.php?id=119742

आता ह्या प्रश्नावर वातावरण तापलेलेच आहे; ते थंड होऊ न देता राज्यशासनाला आपल्या अन्याय्य व अत्याचारी धोरणात आवश्यक त्या सर्व सुधारणा करण्यास भाग पाडेपर्यंत आपण आपला लढा चालूच ठेवायला हवा.

सर्व स्वाभिमानी मराठी नागरिकांना आमच्या या शासनाच्या मराठी शाळांविरोधी धोरणाविरुद्ध लढ्यास यथाशक्य पाठिंबा देण्याची आम्ही कळकळीची विनंती करतो.

***- 'शिक्षण अधिकार समन्वय समिती'***

(रमेश पानसे, सुनीती सु० र०, सुधा भागवत, सुहास कोल्हेकर, विजय पाध्ये, सलील कुळकर्णी)

(ई-मेल: shi.a.sa.sa@gmail.com)

❑ ❑ ❑